जा.क्र.कोजिप/राशाछविवीक्रीप्रशि/नैपुण्यचाचणी/२०२२,
राजर्षी शाहू छत्रपती विद्यानिकेतन व निवासी क्रीडा
प्रशाला, शिंगणापूर (चंबुखडी), ता-करवीर.
दिनांक :- ०७.०६.२०२२.

प्रति,

मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग, (आय.टी.सेल)
जिल्हा परिषद, कोल्हापूर.

विषय :- जि.प.च्या वेबसाईटवर लिंक सोडणेबाबत....

उपरोक्त विषयांस अनुसरुन जिल्हा परिषद, कोल्हापूर संचलित राजर्षी शाहू छत्रपती राजर्षी शाहू छत्रपती विद्यानिकेतन व निवासी क्रीडा प्रशाला, शिंगणापूर (चंबुखडी), ता- करवीर, जिल्हा कोल्हापरकडे निवासी क्रीडा प्रशालेकडे सन २०२२-२०२३ करीता खेळाडूंची नैपुण्य चाचणी करुन निवड करणेत येणार आहे. सदरची नैपुण्य चाचणी हि फक्त जिल्हा परिषद कोल्हापूर अंतर्गत शाळाकरीता आहे. सदरच्या चाचणीमध्ये कोणत्याही परिस्थितीत खाजगी शाळेतील कोणत्याही विद्यार्थ्याला प्रवेश दिला जाणार नाही. या निवासी क्रीडा प्रशालेकडील नैपुण्य चाचणीची प्रवेशाची लिंक जिल्हा परिषद, कोल्हापूरकडील संकेतस्थळावर प्रदर्शीत करणे, तसेच ऑफलाईन प्रवेश अर्ज आणि माहितीपत्रक प्रदर्शीत करणेविषयी विनंती आहे.

नैपुण्य चाचणी प्रवेशासाठी लिंक खालीलप्रमाणे :-
https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSdG89TgH3_UAxKGKymzOcli0pdqmrn1seZHNhvoiWx5GyoVeg/viewform?usp=sf_link

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, कोल्हापूर.

प्रत माहितीसाठी सादर,
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर.

**राजर्षी शाहू छत्रपती विद्यानिकेतन व निवासी क्रीडा प्रशाला,**
**शिंगणापूर, (चंबुखडी) ता- करवीर, जिल्हा कोल्हापूर**
**निवड चाचणीसाठी प्रवेश अर्ज.**

फोटोवर
मुख्याध्यापक
यांची सही
व शिक्का

| | | |
|---|---|---|
| १ | शाळेचे नांव | |
| २ | मुख्याध्यापक यांचे मोबाईल नंबर | |
| ३ | खेळाडूचे नांव | |
| ४ | वडिलांचे नांव | |
| ५ | जन्म तारिख - अंकी<br>अक्षरी | |
| ६ | इयत्ता | |
| ७ | लिंग (मुलगा/मुलगी) | |
| ८ | क्रीडा प्रकार | |
| ९ | आधार क्रमांक | |
| १० | विद्यार्थ्याचा युआयडी नंबर | |
| ११ | खेळाडूचा पत्ता | |
| १२ | पालकांचा मोबाईल नंबर | |
| १३ | रजिस्टर क्रमांक व वर्ष | |
| १४ | शरिरावरील कायमस्वरुपी खुणा | १)<br>२) |
| १५ | खेळाडूची स्वाक्षरी | |

टिप :- फक्त जिल्हा परिषद शाळेतीलच विद्यार्थी अर्ज करण्यास पात्र राहील.

# जिल्हा परिषद, कोल्हापूर संचलित
# राजर्षी शाहू छत्रपती विद्यानिकेतन व निवासी क्रीडा प्रशाला, शिंगणापूर (चंबुखडी), ता- करवीर, जिल्हा कोल्हापूर.

जिल्हा परिषद कोल्हापूर संचलित राजर्षी शाहू छत्रपती विद्यानिकेतन व निवासी क्रीडा प्रशाला, शिंगणापूर (चंबुखडी), ता- करवीर, जिल्हा कोल्हापूरकडे एक नाविन्यपुर्ण उपक्रम म्हणून निवासी क्रीडा प्रशाला सुरु करण्यात आली आहे. यामध्ये कब्बडी, खो-खो, मैदानी आणि कुस्ती या खेळ प्रकाराचे प्रशिक्षण दिले जात आहे.
जिल्हा परिषद कोल्हापूर अंतर्गत जिल्हयातील फक्त जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यासाठी निवासी क्रीडा प्रशाला कार्यरत आहे. **याठिकाणी खाजगी शाळेतील कोणत्याही विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात नाही.** याठिकाणच्या विद्यार्थ्यांना मोफत अल्पोपहार व भोजन व इतर अनुषंगीक सर्व बाबी हया मोफत दिल्या जातात.
सन २०२२-२०२३ साठी निवासी क्रीडा प्रशालेकडे कब्बडी, खो-खो, कुस्ती व मैदानी या चार खेळांसाठी विद्यार्थ्यांची क्रीडा नैपुण्य चाचणीद्वारे निवड करण्यात येणार आहे. यामध्ये नऊ शारीरिक चाचणीमधून गुणाद्वारे विद्यार्थ्यांची निवड केली जाणार आहे. तरी आपल्या गावातील फक्त जिल्हा परिषद कोल्हापूर अंतर्गत शाळेतील विद्यार्थ्यांची खेळनिहाय यादी तयार करुन दि. १६.०६.२०२२ पर्यंत विद्यानिकेतन शिंगणापूरकडे ओळखपत्रासह तसेच इतर खालील काही बाबींची पुर्तता करुन यादी सादर करावी. **तसेच एका विद्यार्थ्यांला कोणत्याही एकाच खेळ प्रकारामध्ये सहभागी होऊन चाचणी देता येईल.**

१) विद्यार्थ्याचे फोटोसह शाळेचे ओळखपत्रा (मुख्याध्यापकाचे सही व शिक्यासह)
२) विद्यार्थ्याचे आधार कार्ड झेराम्क्स प्रत.
३) जन्म नोंद दाखला झेरॉक्स प्रत.

**खेळनिहाय जन्म तारीख**

**१)** मैदानी व कुस्ती खेळ प्रकारासाठी जन्म दि. ०१.०१.२०१० व त्यानंतरची असणे आवश्यक आहे.
**२)** खो-खो खेळा प्रकारासाठी जन्म दि. ०१.०१.२००९ व त्यानंतरची असणे आवश्यक आहे.
**३)** कब्बडी खेळ प्रकारासाठी जन्म दि. ०१.०१.२००८ व त्यांनतरची असणे आवश्यक आहे.

**निवासी क्रीडा प्रशालेकडील निवड चाचणीसाठी खालील प्रकारच्या शारीरिक चाचणी देणे बंधनकारक आहे.**

१) उंची
२) वजन
३) ३० मिटर वेगात धावणे.
४) जागेवरुन लांब उडी मारणे.
५) जागेवरुन उंच उडी मारणे.
६) मेडिसीन बॉल थ्रो.
७) ६X१० शटल रन.
८) लवचीकता.
९) ८०० मिटर धावणे.